RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक १४] मंगळवार, मार्च २४, २०२६/ चैत्र ३, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक ३०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **२४ मार्च, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा **नियम ११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

L. A. BILL No. XXVIII OF 2026.

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
LAND REVENUE CODE, 1966.

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.

१९६६ चा महा. ४१.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३७अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या कलम ३७अ मधील,— १९६६ चा महा. ४१.

(एक) पोट-कलम (१) मध्ये,—

(अ) "राज्य शासनाची पूर्वपरवानगी घेण्याच्या" या मजकुराऐवजी, "राज्य शासनाच्या मान्यतेस" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, जर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१२ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी अधिमूल्य किंवा नजराणा किंवा आकार व अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा प्रदान केल्यावर, शासनाने, शासन निर्णय किंवा सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून कोणत्याही शासकीय जमिनीची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफ.एस.आय.) वापर, हस्तांतरणीय विकास हक्कांचे (टी.डी.आर.) हस्तांतरण किंवा वापरातील बदल, यास मान्यता दिलेली असेल तर अशी मान्यता या संहितेच्या तरतुदींनुसार वैधपणे दिलेली असल्याचे मानण्यात येईल."; २०१५ चा महा. ४.

(दोन) पोट-कलम (२) मध्ये, "परवानगी" या मजकुराऐवजी, "मान्यता" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ३७अ मध्ये अशी तरतूद आहे की, या संहितेच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींन्वये विविध प्रयोजनांसाठी देण्यात आलेली, राज्यातील कोणत्याही शासकीय जमिनीची विक्री, हस्तांतरण, पुनर्विकास, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाचा (एफ.एस.आय.) वापर, हस्तांतरणीय विकास हक्कांचे (टी.डी.आर.) हस्तांतरण किंवा वापरातील बदल, राज्य शासनाची पूर्वमान्यता घेण्याच्या अधीन असेल. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१२ (२०१५ चा महा. ४) द्वारे, उक्त कलम उक्त संहितेमध्ये समाविष्ट केले आहे.

२. उक्त संहितेच्या कलम ४० मध्ये अशी तरतूद आहे की, या संहितेच्या कोणत्याही तरतुदीमधील कोणत्याही मजकुरामुळे, सरकारची मालमत्ता म्हणून कोणत्याही जमिनीची राज्य शासनाला योग्य वाटेल अशा अटी व शर्तींवर विल्हेवाट लावण्याच्या राज्य शासनाचे अधिकारकमी होणार नाही. उक्त सुधारणा अधिनियमापूर्वी, शासन, आवश्यक सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून, उक्त संहितेच्या, मुख्यतः कलम ४० च्या आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम, १९७१ च्या तरतुदींनुसार शासकीय जमिनीची विल्हेवाट लावीत असे. शासनाने, नजराणा, अधिमूल्य किंवा अनर्जित उत्पन्न आकारून, उक्त संहितेच्या तरतुदी आणि वेळोवेळी काढलेले विविध शासन निर्णय यांअन्वये, शासकीय जमिनीचे विविध व्यवहार देखील नियमित केलेले आहेत.

३. असे निदर्शनास आले आहे की, शासकीय जमिनींचे असे अनेक व्यवहार झाले आहेत की, ज्यामध्ये, कलम ३७अ अन्वये शासनाची पूर्वपरवानगी घेण्यात आलेली नाही. उक्त सुधारणा अधिनियमापूर्वी शासन जे व्यवहार नियमित करू शकले असते, असे व्यवहार शासन नियमित करू शकत नाही. म्हणून, शासकीय जमिनीच्या अशा व्यवहारांकरिता शासनाची मान्यता घेण्याची तरतूद करण्यासाठी उक्त कलम ३७अ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, असे शासनास वाटते. उक्त संहितेत विशेषकरून अशी तरतूद करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे की, उक्त सुधारणा अधिनियमापूर्वी अधिमूल्य किंवा नजराणा किंवा आकार व अनर्जित उत्पन्नाचा हिस्सा प्रदान केल्यावर, शासनाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून शासकीय जमिनीच्या व्यवहारांना दिलेल्या मान्यता, उक्त संहितेच्या तरतुदींन्वये वैधपणे दिलेल्या असल्याचे मानण्यात येईल.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २३ मार्च, २०२६.

चंद्रशेखर बावनकुळे,
महसूल मंत्री.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक २४ मार्च, २०२६.

जितेंद्र भोळे,
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.